# मंत्रिमंडळ निर्णय
# 1 ऑगस्ट 2012
# (मंत्रिमंडळ बैठक क्र. 84)

| अक्र | विषय | विभाग |
|---|---|---|
| 1 | मंत्रालय मुख्य इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात | सार्वजनिक बांधकाम |

## मंत्रालय मुख्य इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात

दिनांक 21 जून रोजी मंत्रालयाच्या मुख्य इमारतीला आग लागून चौथ्या, पाचव्या व सहाव्या मजल्यांची हानी झाली होती. या मजल्यांच्या दुरुस्ती आणि नुतनीकरणाच्या कामास सुरुवात करण्यात येत आहे. यासाठी 81 कोटी 64 लाख रुपयांच्या खर्चास आज मान्यता देण्यात आली.

या नुतनीकरणाच्या कामाची देखरेख करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आर्किटेक्ट राजा अडेरी यांच्याकडे या नुतनीकरणाचे काम देण्यात आले आहे. त्यांना कॉन्सिल ऑफ आर्किटेक्टनुसार योग्य ते शुल्क अदा करण्यात येणार आहे.

-----0-----